**श्री. गणेश नागनाथ बोबडे, अधिव्याख्याता यांच्या विनंती बदलीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन आदेश क्र. एडीआर-२०२६/प्र.क्र. ४५/CN १७७६९३३/तांशि-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, विस्तार इमारत,मुंबई-४०००३२.
दिनांक:- ११ ऑगस्ट, २०२६.

**वाचा:** १) साप्रवि अधिसूचना एसआरव्ही-२००४/प्र.क्र. १५/०४/१२ दिनांक २५ मे, २००६.
२) कला संचालनालय पत्र क्र. डिओअे-२०२६/तीन/१०८९ दिनांक २८ जुलै, २०२६.
३) श्री. गणेश बोबडे यांचा विनंती अर्ज दिनांक २३ जुलै, २०२६.

**शासन आदेश :**

संदर्भ क्र. १ येथील महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) (दोन) मध्ये विहित केलेल्या तरतूदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांच्या मंजूरीने कला संचालनालयाच्या आस्थापनेवरील खाली नमूद केलेल्या, अधिव्याख्यात्यांची विनंती बदली करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अध्यापकाचे नाव व पदनाम | सध्या कार्यरत संस्थेचे नाव व ठिकाण | प्रस्तावित बदलीच्या संस्थेचे नाव व ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. गणेश नागनाथ बोबडे, अधिव्याख्याता | सर ज.जी. अभिकल्प महाविद्यालय, मुंबई | शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर | विनंती बदली |

०२. बदलीच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरिता खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(१) हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

(२) बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित अधिव्याख्यात्यांनी सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतून तात्काळ त्यांची बदलीनंतर पदस्थापना केलेल्या संस्थेत रुजू व्हावे. तसेच संबंधित कला संस्था प्रमुखांनी बदली झालेल्या अधिव्याख्यात्यांना तातडीने कार्यमुक्त करावे.

(३) बदली झालेले अधिव्याख्याता त्यांच्या संबंधीत संस्थेकडून कार्यमुक्त होऊन रुजू होण्यासाठी आल्यानंतर त्यांना विनाविलंब रुजू करुन घ्यावे. संबंधित अधिव्याख्यात्यांना रुजू करुन न

घेतल्यामुळे सक्तीचा प्रतिक्षाकाळ ठरुन काम न करता वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास संबंधित संस्थेच्या अधिष्ठातांना जबाबदार धरण्यात येईल.

(४) बदली झालेल्या अधिव्याख्यात्यांची कोणतीही रजा प्रशासकीय विभागाच्या पूर्वमान्यतेशिवाय मंजूर करण्यात येऊ नये.

(५) उपरोक्त अधिव्याख्यात्यांना शासन नियमानुसार पदग्रहण अवधी, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

(६) विनंती बदली झालेल्या अधिव्याख्यात्यांना बदलीच्या जागी तात्काळ रूजू व्हावे. सदर अधिव्याख्यात्यांचा रूजू अहवाल संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास सादर करावा

०३. हा शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८११११५१७५६५२०८ असा आहे. सदर शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल याच्या आदेशानुसार व नावाने,

A S MUTYAL

Digitally signed by A S MUTYAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=daee80ec44e60c590272017d95394b0b605cfddee15c8895212ac4add74386f5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BEC50BCA597E7B3FD46D9282C52300269EB689D8C130253FCE76651562083F8B, cn=A S MUTYAL
Date: 2026.08.11 15:19:06 +05'30'

**(अ. शा. मुत्याल)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत :-**

१. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
६. कुलसचिव, सर ज.जी. कला वास्तुकला आणि अभिकल्प विद्यालय, मुंबई
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) नागपूर
८. कोषागार अधिकारी, नागपूर
९. श्री. गणेश नागनाथ बोबडे, अधिव्याख्याता (कला संचालनालयामार्फत)
१०. निवड नस्ती, तांशि-६